# ललित कलांचे सौंदर्य शास्त्र

सौ. कल्पना जैन

*सहाय्यक प्राध्यापक,*

*संगीत विभाग, एस्.एन्.डी.टी. कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड*

*एस.सी.बी. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स फॉर वुमन, चर्चगेट, मुंबई.*

---

***सारांश :***

***मानवाची सर्व धडपड आनंद प्राप्तीसाठीच असते. सृष्टीच्या आरंभापासूनच मानव सतत आनंदाचा शोध घेत आला आहे. त्याच्या सुंदरतम भावनांची अभिव्यक्ती कलात्मकरित्या कलेच्या रुपाने जन्माला आली. कला म्हणजे काय याबद्दल अनेक विद्वानांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. भारतामध्ये एकूण ६४ कला मानल्या गेल्या. त्यांचे विभाजन उपयोगी कला व ललित कला असे करण्यात आले. ललित कलांमध्ये वास्तुकला, मूर्तीकला, काव्यकला, चित्रकला व संगीत कला अशा पाच कलांचा समावेश होतो. ललित कलेची आवश्यक तत्वे म्हणजेच रस व त्याव्दारे निर्मित सौंदर्यशास्त्र. प्रस्तुत प्रबंधात कलांचा अभ्यास करतांना या तत्वांचा विचार केला आहे. संगीतात स्वरांद्वारे, रसनिष्पत्ती होते. साहित्यात भाषा, शब्द, अलंकार याद्वारे, चित्रकलेत रेषा, रंगाद्वारे, स्थापत्य व मूर्ती कलेत आकार, शैली, स्वरुप यांद्वारे रसनिष्पत्ती होते. तसेच लय हे तत्वही ललित कलांमध्ये रसनिष्पत्ती करण्यास सहाय्यकारी आहे. सौंदर्यशास्त्राचे काही आवश्यक तत्वे आहेत. जसे संघटन व संयोजन, नवीनता, संपूर्णता, संतुलन प्रमाण, विरोधाभास, व्यवस्थितक्रम व स्थायित्व या दृष्टीनेही ललित कलेत ही तत्वे कशाप्रकारे आहेत त्याचे विवेचन दिले आहे.***

***प्रस्तावना :***

मानवाच्या भावनांच्या सुंदरतम अभिव्यक्तीचे व्यापक माध्यम म्हणजे कला सृष्टीच्या आरंभीपासूनच मानव सतत आनंदाचा शोध घेत आला आहे. त्याच्या कल्पनाशक्तीच्या आधारे तो सभोवतालच्या सृष्टीशी तादात्म्य स्थापित करु पाहत आहे. त्याच्या या कलात्मक प्रवृत्तीस मूर्त रुप देण्याच्या प्रयासातूनच ललित कला जन्माला आल्या. कलेची उत्पत्ती मानव संस्कृतीच्या विकासातूनच मानली जाते. 'कला' याचा शाब्दीक अर्थ आहे. ''सौंदर्याभिव्यक्ति'' अभिव्यक्ती हे कलेचे एकमेव उद्दिष्ट आहे.

टायॅस्टालच्या म्हणण्यानुसार 'कला अशी क्रिया आहे ज्याद्वारे मानव एखादया भावनेचा अनुभव करतो व तो अनुभव सोद्देश्य इतरांपर्यंत पोहचवतो.' लूटन ब्रेक च्या म्हणण्यानुसार 'जेव्हा मनुष्याचा रुबाब, कुशलता आणि मनाच्या आवेगाच्या मिश्रणाने अशी वस्तू निर्माण होते की, जी इतर सर्वांपेक्षा महान होते, तेव्हा तिला कला असे म्हणतात. वागनरच्या म्हणण्यानुसार 'कला मानवाच्या सामाजिक जीवनाचे उत्कृष्ट असे प्रकाशन

आहे.' तर गोथेने त्याला आत्म्याची जादू म्हटले आहे. 'सत्याने मुक्त झालेल्या आत्मा म्हणजे कला असे कार्लाइल ने म्हटले आहे. चित्रपटातील प्रसिध्द कलाकार स्व. पृथ्वीराज कपूर यांनी एखादया कामाचे रुपांतर कलेत कसे होते हे अगदी सोप्या भाषेत सांगितले आहे. ते म्हणतात 'हातापायांनी केलेले काम म्हणजे मजुरी, जेव्हा त्यात बुध्दीची भर पडते तेव्हा ती कारागिरी आणि त्यास हृदयाची साथ मिळाली की ती कला म्हणून साकार होते.' कला कल्पनेच्या मदतीने मानवाला त्याच्या इंद्रिय बंधनातून, देशकाल परिस्थितीच्या मर्यादेतून बाहेर काढते आणि कलाकाराच्या इच्छापूर्ततेचे साधन बनते. याद्वारे आनंदाची जी उत्पत्ती होते तोच कलेचा खरा आनंद होय. कलेमध्ये कल्पनेतून भावाभिव्यक्ती व त्याद्वारे आनंद निर्मितीस खूप महत्व आहे.

***कलेचे प्रकार :***

भारतात एकूण ६४ कला मानल्या गेल्या आहेत. त्या कलांना सामान्यपणे दोन भागात विभाजित केल्या गेल्या.

१. ललित कला, २. उपयोगी कला.

ललित कला मनुष्याच्या सौंदर्यबोधाचे प्रतिक आहे. तर उपयोगी कला मानवाच्या भौतिक गरजांच्या पूर्ततेशी संबंधित आहेत. उपयोगी कलांमध्ये भरतकाम, विणकाम, पाककला इ. सारख्या कलांचा समावेश होतो. तर ललित कला प्रामुख्याने ५ मानल्या गेल्या आहेत त्या म्हणजे :-

(१) वास्तुकला, (२) मूर्तीकला, (३) काव्यकला, (४) चित्रकला, (५) संगीत कला.

***ललित कला व रसानुभूती :-***

रस हे ललित कलांमधील प्राणभूत तत्व आहे. भरत मुनिकृत नाटयशास्त्रात नऊ रस सांगितले आहेत. (श्रृंगार, हास्य, करुण इ. ) परंतु ललित कलांच्या संदर्भात भारताच्या या रस सिध्दान्ताप्रमाणे विविध रसांचा नव्हे तर रसाच्या उच्चतम पातळीचा विचार करावा लागेल. ललित कलांच्या संदर्भात परम सौंदर्यानुभूतिलाच शुध्द रसानुभूति म्हणता येई. ललित कलेची व्याख्या हिंदी शब्द सागर मध्ये अशा प्रकारे केलेली आहे. त्या कला ज्या व्यक्त करतांना सौंदर्याची अपेक्षा असेल, म्हणजेच ललित कलांचा मुख्य उद्देश सौंदर्यानुभुति करणे हाच आहे. सौंदर्यागुणांनी युक्त असल्याकारणाने त्या विविध रसांची निष्पत्ती करण्यासाठी सक्षम आहेत. आध्यात्मिक रसानुभुतिसाठी तनमनाची स्थिरता व बुध्दीची एकाग्रता अपेक्षित आहे.

संगीतात रसनिष्पत्ती स्वरांद्वारे होते.

'सारी वीरेSदभुते रौद्रे धो बीभत्से भयानके ।'
कार्यो ग नी तु करुणे हास्यशृंगारयोमपौ ॥

म्हणजे सा रे या स्वरांनी वीर, अदभुत व रौद्र, ध ने बीभत्स व भयानक ग आणि नी यांनी करुण व म आणि प यांनी हास्य व शृंगार हे रस उद्दीपित होतात. अशा प्रकारे स्वरांची रसांशी सांगड घातलेली शास्त्रांमधून आढळते. स्वरांबरोबरच इतर अनेक गोष्टीही रसनिर्मिती करण्यास कारणीभूत असतात. उदा. गीताची लय,

काव्याचा अर्थ, प्रसंग इत्यादी विद्वानांच्या मते कोमल रे ध वर्ग (भैरव व पूर्वी थाट प्रकार) करुण व शांत रसांना अनुकुल व शुध्द रे ध वर्ग (यमन, बिलावल, खमाज) शृंगार रसाला अनुकुल व कोमल ग नी वर्ग (भैरवी, काफी, आसावरी, थाट प्रकार) वीरादिक रसोपयोगी आहेत.

संगीताप्रमाणे चित्रकलेत रंगाद्वारे रसनिष्पत्ती सांगितली आहे. भरताने रसांचे वर्णन करतांना त्यांचे वर्ण (रंग) सांगितले आहेत.

| **रस** | **वर्ण** |
|---|---|
| शृंगार | श्याम / जांभळा |
| हास्य | सित |
| करुण | कपोत / पारवा |
| रौद्र | रक्त |
| वीर | गौर / गुलाबी |
| भयानक | कृष्ण / काळा |
| बीभत्स | नील |
| अदभूत | पीत |

त्याचप्रमाणे नृत्यांच्या ज्या विविध भावभंगिमांचा उल्लेख आहे त्या मूर्तीकलेत आढळून येतात. काव्यामध्ये हीच रस निष्पत्ती शब्दालंकारांमधून तर स्थापत्य कलेत आकार, त्यातील शैली, रुप यामधून होते.

श्रोता किंवा प्रेक्षक जेव्हा कलेतील भावनेशी एकरुप होतो, क्षणभर तीच भावना त्याच्या मनात जागृत होते, तो त्या भावनेशी तादात्म्य पावतो तेव्हा रसप्रतीत होतो. ललित कलेमध्ये रस या शब्दाचा अर्थ भावनेशी जोडणे अधिक समर्पक ठरेल.

रसोत्पत्तिचे दुसरे महत्वाचे अंग म्हणजे लय. एकच स्वरसमूह वेगवेगळया लयीत म्हटल्यास त्यातील रस वेगवेगळा भासतो. उदा. पूरिया, मारवा, सोहोनी या रागांचे स्वर सारखे असले तरी प्रत्येक स्वर लावण्याची पध्दत, लय, ठहराव, संगती निरनिराळी आहे. त्याची प्रकृती वेगळी आहे म्हणून त्यांच्या द्वारे वेगवेगळी रसनिष्पत्ती झालेली आढळते. अशीच लय चित्रकलेत रंगाद्वारे काव्यात छंदाद्वारे तर मूर्तीकलेत आकारांद्वारे साधावी जाते.

'रागमाला' ही चित्रे पाहतांना ती रागध्यायात वर्णन केलेल्या स्वरुपानुसार आहेत असे आढळते. उदा. संगीत दर्पण या ग्रंथात दामोदर पंडीत यांनी भैरव रागाचे स्वरुप वर्णन करताना म्हटले आहे.

गंगाधर शशिकलातिकास्त्रिनेत्र:, सर्पेर्विभूषितनुर्गजकृलिकवासा: ।
भास्वत त्रिशूलकर एष नृमण्डधारी, शुभ्राम्बरो जयति भैरव आदिराग ॥

भैरवाचे जे वर्णन साहित्यकाराने केले आहे त्याला स्वरांची जोड मिळताच त्यातून जी भावाभिन्नती निर्माण होते तीच चित्रकला व मूर्तीकलेच्या माध्यमातून दृष्यरुपात समोर येते.

***ललित कलांचे सौंदर्य शास्त्र :***

सौंदर्यशास्त्र हा शब्द ग्रीक Atotiko या शब्दावरुन आला. ज्ञानेद्रियांना सुख देणारी चेतना असा तिचा अर्थ आहे. यालाच इंग्रजीत Atotiko असे म्हणतात. Atotiko या शब्दाचा अर्थ निसर्ग सौंदर्याचे विश्लेषणात्मक रुन असा झाला व ललित कलांच्या मूळ सिध्दांतानुसार निरुपण व कलाकृती मूल्यांकन अशा अर्थाने वापरला जाऊ लागला. ललित कलांमधून मिळणाऱ्या सौंदर्यानुभवाचे विश्लेषण म्हणजे सौंदर्यशास्त्र, सौंदर्याकृतीचा आशय हा आत्मा आहे आणि अभिव्यक्ती वा आकृतिबंध तिचा देह आहे. असा दृष्टीकोन रुढ आहे. ललित कला या आशयघन कला आहेत. आशयाचा जन्म जीवनमूल्यांच्या पोटी होत असतो. कलावंतांच्या जीवन दृष्टीने जीवनाचे केलेले आकलन, मूल्यमापन असे आशयाचे रुप असते. ललित कला संवेदनानिष्ठ, आकृतिनिष्ठ सौंदर्याकृती आहेत. यांची साधने (घटक) भिन्न आहेत. स्वर-ताल ही संगीताची, रेषा-रंग-आकार ही चित्रकलेची, शब्द -छंद- अलंकार ही साहित्याची तर शैली-आकार ही मूर्ती कलेची साधने आहेत. या कलांची निर्मिती आणि प्रत्यय यांचा सांस्कृतिक मूल्यांशी घनिष्ट संबंध आहे. या कलांचे तत्वज्ञान हेच या कलांचे सौंदर्यशास्त्र.

***आवश्यक तत्व :***

विद्वानांच्या मते सौंदर्याची काही प्रमुख तत्वे आहेत, जी कलेत सौंदर्य निर्मितीसाठी उपयुक्त ठरतात. प्रत्येक ललित कलांमधे या तत्वांचे यथोचित निरुपण करुन सौंदर्य निष्पत्ती केली जाते उदा.

१) ***संघटन व संयोजन :-*** कलेच्या सर्व तत्वांच्या एकत्रीत प्रयोगाने अनेकतेत एकतेचा अविर्भाव हेच कलेचे प्रमुख तत्व आहे. एखादया दृश्य चित्रात रेखांकन, वस्तुचा आकार, बनावट छाया व प्रकाश रंग संयोजन यामध्ये एकरुपता असणे गरजेचे आहे. तसेच संगीतात स्वरांचा लगाव वादी संवादी स्वरांचा उचित प्रयोग, पूर्वांग - उत्तरांगात लागणारे स्वर, आरोह अवरोहात येणाऱ्या स्वरांचा योग्य प्रयोग यांच्या समन्वयानेच रागाचे संयोजन करता येते. साहित्यात शब्द, अर्थ, रुपक, अलंकार त्यातील तालबध्दता इत्यादींचे संघटन व संयोजन गरजेचे आहे.

२) ***नवीनता :-*** कलेचे रहस्यपूर्ण सौंदर्य जिज्ञासेचे कारण ठरते. कलाकाराची कलाकृती विविध रुपांनी नाविण्याची अनुभुति देत असते. कलाकृतीचे स्वरुप हे खोल डोहाप्रमाणे आहे. डोहाच्या तळाशी काय रहस्य असेल याची जिज्ञासाच डोहाचे आकर्षण ठरते. चित्रातही असे रहस्य दडलेले असते. एकच चित्र

वेगवेगळया चित्रकारांनी काढल्यास ते नवीन वाटते. त्याचप्रमाणे संगीत नियमबध्द असूनही स्वकल्पनाशाक्तीच्या आधारे गायक त्यात नाविण्य आणतो. म्हणूनच विविध घराण्यांमधील कलाकारांद्वारे यमन हा एकच राग ऐकताना वेगवेगळी सौंदर्यानुभूती येते. एकाच देवतेची मूर्ती विविध मूर्तीकाराने घडविल्यास वेगळी अनुभुती देते तर एकाच विषयावरील साहित्यही वेगळे भासते.

३) ***संपूर्णता :-*** कोणत्याही कलेच्या अभिव्यक्तीची स्पष्टता त्याच्या पूर्णतेतच असते. संगीतात रागाचे सौंदर्य बंदीश, आलाप, ताना अशा विविध क्रियांद्वारे प्रस्तुत केल्यानंतरच स्थापित होते. याचप्रमाणे इतरही ललित कलांची अभिव्यक्ती त्या पूर्णरुपात असल्याशिवाय होत नाही.

४) ***संतुलन :-*** कला व सौंदर्यामधील संतुलन हे एक सामान्य तत्व आहे. कोणत्याही कलेच्या सर्व तत्वांचा योग्य प्रमाणात प्रयोग केल्याने संतुलन स्थापित होते. चित्र, मूर्ती, स्थापत्य या कलांमध्ये समविभक्तता किंवा अंदाज हे संतुलन पर्याय आहे. संगीतातही अशाच प्रकारे गाताना मंद्र, मध्य, तार स्वरांचे संतुलन, बंदीश गातांना आलाप, ताना यांचे संतुलन ठेवले जाते.

५) ***प्रमाण :-*** कलेच्या प्रस्तुतिकरणात विषयानुरुप प्रमाण असणे आवश्यक आहे. चित्रात रंग, रेखा, रिक्त स्थान यांचे योग्य प्रमाण स्थापत्य कलेत आकार, स्वरुप त्याच प्रमाणे साहित्यात अलंकाराचे प्रमाण असल्यास ते जास्त परिणामकारक ठरते. त्याचप्रमाणे संगीतातही विभिन्न क्रिया करुन दाखवतांना कुठल्या गोष्टीला किती वेळ दयायचा याचे प्रमाण योग्य ठेवले तर ती कलाकृती यशस्वी ठरते. संगीतातील ताल व त्यांचे खंड वेगवेगळे प्रमाण ठेवण्यास सुसह्य ठरतात.

६) ***विरोधाभास :-*** ललित कलांच्या तत्वांमध्ये कधी कधी विरोधाभास दिसत असला तरी त्यांच्या मुळ रुपात सुसंगती दिसून येते. विरोधाभासाचा आभास कधी कधी अर्थाला अधिक स्पष्ट व सार्थ रुप प्रदान करतो. जसे एकाच थाटातील अनेक राग, एक गंभीर प्रकृतीचा तर एक चंचल प्रकृतीचा, काही राग दोन किंवा दोन पेक्षा जास्त रागांच्या मिश्रणाने तयार झाले आहेत. परंतु तो राग गातांना प्रत्येक राग वेगवेगळा न वाटता एक संपूर्ण राग वाटतो.

७) ***व्यवस्थीतक्रम :-*** प्रत्येक कलेच्या रचनेसाठी व्यवस्थित क्रम असणे आवश्यक आहे. कलासामुग्री व उपकरणांची योग्य व्यवस्था कलाकारांच्या कुशलतेचे प्रतीक असते. चित्रकला, मूर्तीकला, स्थापत्य कला, साहित्य कला यांच्या रचना पूर्ण रुपातच समोर येतात तर संगीत कलेत ती विविध क्रमाने पुढे येते जसे स्वरविस्तार, बंदिश, आलाप, ताना इ. म्हणून कलाकाराद्वारे क्रमनिर्धारित कलाकृतीचे प्रस्तुतीकरणच सौंदर्यासृष्टीचा आनंद प्रदान करतात.

८) ***स्थायित्व :-*** ललित कलांमधे स्थायित्वाचा गुण सौंदर्यसृष्टी करण्यासाठी विशेष सहायक ठरतो. वेगवेगळया कलाकारांद्वारे वेगवेगळया प्रकारे कलेचा निर्वाह करुनही मूळ रुपाला धक्का लागत नाही. ज्याप्रमाणे कृष्णाचे चित्र किंवा मूर्ती किंवा त्याचे वर्णन कोणत्याही शैलीत असले तरी कृष्णाच्या

रुपाचे संचित करणाऱ्या गोष्टी त्याच असतात. अशाच प्रकारे रागाची बंदीश, गायक, वादक स्थान इत्यादी भिन्न असले तरी रागाचे स्वरुप स्थाई असते.

९) ***विविधता :-*** ललित कलांच्या संदर्भात विविधता हे प्रमुख लक्षण आहे. कलाकार आपल्या कौशल्य प्रतिभेद्वारे कलाकृतीला वेगवेगळया रुपात प्रस्तुत करतो. एकच कलाकृती विविध माध्यमाव्दारे सुशोभित करुन सौंदर्य निर्माण करते.

१०) ***अलंकार :-*** ललित कलामध्ये सौंदर्य वृध्दीसाठी अलंकार म्हणजेच आभूषणे हे महत्वाचे तत्व आहे. याचे महत्व दर्शवतांना नाटयशास्त्रात लिहिले आहे. ज्याप्रमाणे 'शृंगाराशिवाय स्त्री' शोभत नाही त्याचप्रमाणे अलंकाराशिवाय गीत शोभत नाही. मूर्ती कला, चित्रकला, साहित्यकला यात अलंकाराचा पुरेपुर उपयोग सौंदर्य निर्मितीसाठी केलेला आढळतो.

११) ***काठिण्य :-*** काठिण्याचा संबंध बुध्दीशी आहे. ललित कलेचा कलाकार आपली कलाकृती बुध्दीच्या आधारे काठिण्य पातळीवर घेऊन जातो व रसिकांमध्ये जिज्ञासा निर्माण करतो. एखादया सरळ रचनेपेक्षा काठिण्य असलेली रचना जास्त प्रभावी ठरते व कलाकाराच्या योग्यतेची प्रचिती देते.

अशा प्रकारे ललित कलांचा उद्देश रसनिष्पत्ती, त्याद्वारे सौंदर्याची अनुभुती व परमोच्च आनंदाची प्राप्ती करुन देणे हाच आहे.

***संदर्भ सूची :***

१. संगीतायन

२. भारतीय चित्रकला का इतिहास

३. संगीत विशारद

४. संगीत अंक

५. संगीत कलाविहार अंक

६. विद्यावाती विशेषांक फेब्रुवारी - २०१७

७. भरतनाटय शास्त्र

८. भारतीय संगीत व संगीत शास्त्र